# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक २२/०४/२०२४ (सोमवार) सायंकाळ

---

### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

### नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई

दिनांक २१/०४/२०२४ रोजी पोलीस स्टेशन भिवापूर येथील स्टाफ पोस्टे भिवापूर हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, मौजा नांद फाटा चिमुर उमरेड रोड येथे १० चक्का टिप्पर क्र. एम एच ४९ बी झेड १७५५ चा वापर करून टिप्पर मध्ये रेती लोड करून अवैधरीत्या वाहतूक करतो. अशा खात्रीशीर बातमीवरून भिवापूर येथील मौजा नांद फाटा चिमुर उमरेड रोड येथे नाकाबंदी करीत असताना १० चक्का टिप्पर क्र. एम एच ४९ बी झेड १७५५ चा चालक **आरोपी नामे– सुरज गूलाब लटारे, वय ३० वर्ष रा. पांजरेपार पोस्ट कांपा ता. चिमुर जि. चंद्रपूर** यास स्टाफने थांबवून पाहणी केली असता टिप्पर वाहनामध्ये अंदाजे ०६ ब्रास रेती ब्रास रेती मिळून आल्याने सदर टिप्पर चालकास टिप्पर मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपींच्या ताब्यातून १) १० चक्का टिप्पर क्रं एम एच ४९ बी झेड १७५५ किंमती १५,००,०००/–रू व त्या मध्ये ०६ ब्रास रेती प्रत्येकी ५०००/– रू ब्रास प्रमाणे एकुण ३०,०००/– रूपये असा एकुण १५,३०,०००/– रूपयाचा मुद्देमाल अवैधरित्या विनापरवाना टिप्पर मध्ये शासनाचा महसुल बुडवुन तसेंच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करून व सरकारी खनिज रेती (वाळु) ची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने जप्त करून **आरोपी नामे– १) सुरज गूलाब लटारे, वय ३० वर्ष रा. पांजरेपार पोस्ट कांपा ता. चिमुर जि. चंद्रपूर २) पुरूशोत्तम मांढरे (एम एच ४९ बी झेड १७५५ चे मालक)** यांचेविरुद्ध पोस्टे भिवापूर येथे कलम ३७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी क्र. १ यास अटक करण्यात आली आहे.

तसेच भिवापूर अंतर्गत मौजा पाहमी येथे **आरोपी नामे–रामचंद्र रामकृष्ण जिवतोडे, वय ३७ वर्ष, रा. हळदगाव ता. कुही जि. नागपूर** याने आपले ताब्यातील १० चक्का टिप्पर क्रं एमएच ४० बी जि ४४३२ किंमत १५,००,०००/– रू व त्यामध्ये ०६ ब्रास रेती प्रत्येकी ५००० रू ब्रास प्रमाणे एकुण ३०,००० रूपये असा एकुण १५,३०,००० रूपये चा माल अवैधरित्या विनापरवाना टिप्पर मध्ये शासनाचा महसुल बुडवुन तसेंच सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करून व सरकारी खनिज रेती (वाळु) ची चोरटी वाहतुक करतांना मिळुन आल्याने जप्त करून **आरोपी नामे–रामचंद्र रामकृष्ण जिवतोडे वय ३७ वर्ष, रा. हळदगाव ता. कुही जि. नागपूर २) मालक शुभम ईश्वर गाठबैल, रा. सुरगाव कुही जि. भिवापूर** यांचेविरूद्ध पोस्टे भिवापूर येथे कलम ३७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपी क्र. १ यास अटक करण्यात आली आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार सपोनि जयप्रकाश निर्मल, पोउपनि महागावे, सफौ अशोकसिंग ठाकुर, पोना रवि जाधव, पोशि दिपक ढोले, चापोशि अविनाश यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**